सोमवार, दि. १९ मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २८४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282



# समाजाला अधर्माचा प्रतिकार करण्यासाठी तयार करावे लागेल

## प.पू. स्वामी गोविंद देवगिरीजी महाराज

**फोंडा, गोवा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवलेनगरी) -** केवळ जप करत बसलो, तर काम होणार नाही. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले होते, 'माझे स्मरण कर पण युद्ध कर !' स्वातंत्र्यानंतर ७० वर्षे आपल्या देशावर काळ्या इंग्रजांची सत्ता होती. आपला देश धर्मशाळा बनला आहे. आता समाजाला अधर्माचा प्रतिकार करण्यासाठी तयार करण्याची आवश्यकता आहे. सनातन धर्माच्या आड येणार्या कायद्यांमध्ये पालट करून देशात कोणते कायदे हवेत, यावर प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. सनातन धम च्या प्रसाराचे कार्य ही साधना, ईश्वराची उपासना आहे. आपण आपल्या व्यक्तीत्वाची बाजी लावून आणि संघटित होऊन परमात्म्याच्या सेवेत स्वतःला अर्पण केले पाहिजे. तर स्वर्णिम काळ दूर नाही, असे मार्गदर्शन श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंद देवगिरीजी यांनी केले. या वेळी देशविदेशातील २० हजारांहून अधिक हिंदू उपस्थित होते.

सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा ८३ वा जन्म ोत्सव आणि संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. म होत्सवातील 'सनातन राष्ट्र संकल्प' सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर सनातनचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले, उत्तर प्रदेश विधानसभेचे अध्यक्ष श्री. सतीश महाना, 'सनातन बोर्ड'चे प्रणेते पू. देवकीनंदन ठाकूर, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष महंत पू. रवींद्र पुरी महाराज, आचार्य महामंडलेश्वर अनंत श्री विभूषित श्री श्री १००८ स्वामी बालकानंद गिरीजी म हाराज, हिंदु जनजागृती समि तीचे राष्ट्रीय मार्गदर्शक सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे, सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता अश्विनी उपाध्याय, अयोध्या येथील सिद्धपीठ हनुमान गढी मंदिराचे महंत राजूदासजी महाराज, इंडोनेशिया येथील धर्मस्थापनम् फाऊंडेशनचे पू. धर्मयशजी महाराज, स्वामी आनंद स्वरूप आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री. दर्शक हाथी हे उपस्थित होते. या वेळी मान्यवरांमध्ये सनातन संस्थेच्या आध्यात्मि क उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ यांचीही वंदनीय उपस्थिती होती.

प.पू. गोविंददेवगिरीजी म हाराज पुढे म्हणाले, ''सनातन संस्थेचे संपूर्ण कार्य आध्यात्मि कतेच्या पायावर उभे आहे. भारत राष्ट्राला एक समजून काम करत आहेत. भगवद्गीता युद्धाच्या भूमीवर सांगितलेला ग्रंथ आहे. सनातन संस्थेनेही या ग्रंथाप्रमाणेच अध्यात्म ापासून युद्धापर्यंत जागृती केली आहे. मी या महोत्सवामध्ये युद्धकलांचे पान २ वर



युवा आदर्श

### लेखक नेता ...

खास लिहले नेत्यांने
आत्मचरित्र पुस्तक
शांतते वाचून काढा
भडकू नका मस्तक
पुस्तकांत भुसनाळी
असती दावे स्फोटक
खदखद पडते बाहेर
वेदना दिसते त्राटक
नाव झळके दिमाखे
अन्यकुणीतर लेखक
आयत्या बिळे नागोबा
वेटोळा घालतो तक्षक
प्रकाशन सोहळे चाले
चमचे असे प्रकाशक
खपवून घ्यावे मजेत
चाळे करतो विदुषक
तोंड रंगवून नाटक्या
गाजवू पाहतो मंचक
गर्दी आली भाड्याने
नसो कथानक रोचक
चांडाळचौकडी सारी
घरातले सगळे प्रेक्षक
कांदेटोमॅटो मारुनका
भोवती सुरक्षा रक्षक
आत्मचरित्र विमोचन
अधीर वाचक चातक
रद्दीवाले सजून बसले
कराया पुस्तक अंतक

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## भाजपाची भव्य तिरंगा यात्रा

# देश सैन्यांच्या व पंतप्रधानांच्या पाठीशी - रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी -** ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर, देशभरात तिरंगा यात्रा काढली जात आहे. (ता.१८) रविवारी जालना शहरात भव्य तिरंगा पदयात्रा काढण्यात आली. यावेळी भाजपा नेते तथा माजी मंत्री रावसाहेब दानवे आणि भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, भाजपा जालना ग्रा.जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, माजी मंत्री आ.अर्जुनराव खोतकर, आ.संतोष पाटील दानवे यांच्यासह जालना शहरातील नागरिक तिरंगा यात्रेत सहभागी झाले होते.

यावेळी रावसाहेब दानवे यांनी सांगितले की, देश लष्कर आणि पंतप्रधान मोदींच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, ही यात्रा देशाची आहे. येथे अनेक लोक तिरंग्यासाठी उभे राहिले आहेत. ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर, देशभरात तिरंगा यात्रा काढली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने लष्करी शक्तीचा योग्य वापर करून जगाला संदेश दिला आहे की, भारत दहशतवादाविरुद्ध गप्प बसणार नाही.

भारतीय सैन्याने शौर्य दाखवले आणि दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. तिरंगा हा आपल्या सन्मानाचे, प्रतिष्ठेचे आणि अभिमानाचे प्रतीक आहे. देशाची गौरवशाली परंपरा जाणून घेणे आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचा आदर करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, ही यात्रा देशाच्या एकतेचे, अखंडतेचे आणि शूर सैनिकांना श्रद्धांजलीचे प्रतीक आहे असे हि ते म्हणाले.



या तिरंगा यात्रांमध्ये माजी सैनिकांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. यामध्ये देशप्रेमींनी भारत माता कि जय, इंडियन आर्मी झिंदाबाद, ऑपरेशन सिंदूर झिंदाबादच्या घोषणा दिल्या.

हि तिरंगा पदयात्रा जनार्धन मामा चौक येथून सुरु होऊन स्वातंत्र्यवीर सावरकर चौक-टांगा स्टैन्ड् ते बडी सडक येथील श्री राम मंदिर येथे म हाआरती करून समारोप करण्यात आल. सदरील भव्य तिरंगा रॅली पदयात्रेस देशप्रेमी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी या भव्य तिरंगा पदयात्रेचे आयोजक भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सर्व देशप्रेमींचे, माजी सैनिकांचे व जालना शहरातील नागरिकांचे सहभागी झाल्याबद्दल आभार मानले.

## जेईएसमध्ये ११वी साठी ऑनलाईन प्रवेशासाठी सहाय्यता केंद्राची स्थापना

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात व जिल्ह्यात इयत्ता.११ वी ऑनलाइन कला, वाणिज्य व विज्ञान शाखेसाठी प्रवेश प्रक्रिया दिनांक १९ मे २०२५ पासून सुरू होत असून जेईएस महाविद्यालय जालना येथे ऑनलाइन सहायता केंद्रची स्थापना करण्यात आली आहे.

जे ई एस महाविद्यालय जालना येथे ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया संदर्भात मोफत मार्गदर्शन व सहाय्यता करण्यात येणार असल्याचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी सांगितले असून, विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया मोफत सहायता केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे.

याबाबतच्या अधिक माहितीसाठी उपप्राचार्य प्रा.प्रवीण बाफना यांच्याशी ९४२१६५८००३ या क्रमांकाची संपर्क साधावा.

# कमिशन मिळालेले नाही!

## रास्त भाव दुकानदारांचे आमदार खोतकरांना विविध मागण्यांचे निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** रास्त भाव दुकानदाराचे माहे डिसेंबर २०२४ पासूनचे आजपर्यंत कमिशन मिळालेले नाही यासह विविध मागण्याचे निवेदन आमदार अर्जुनराव खोतकर यांना जालना तालुक्यातील सर्व रास्त भाव दुकानदारांनी दिले. दिलेल्या निवेदनात दुकानदारांनी रास्त भाव दुकानदारांचे कमिशन १५० रुपये वरुन किमान ३०० रुपये करण्यात यावे, प्रत्येक रास्त भाव दुकानदारस दुकानात वेळेवर व मोजून धान्य देण्यात यावे, केवायसी करण्यासाठी येणाऱ्या अडचणी बाबत रास्त भाव दुकानदारास वेठीस धरू नये, व दुकानदारांवर कोणतीही कारवाई करू नये आदीं मागण्या करण्यात आल्या. यावेळी मनीत कक्कड (शहराध्यक्ष) प्रभाकर डोंगरे (ग्रामीण अध्यक्ष) संकेत पाटील, नितीन श्री सुंदर, विश्वनाथराव ढवळे, नारायण काळे, रवींद्र जयस्वाल, श्याम वाघमारे, अनिल घाडगे, शैलेश कक्कड, गणेश गुलापल्ली व अरुण इंगोले ,कुणाल टाक, बबनराव सुळसुळे, राम शहाणे राम चंद्र फुलझाडे, आनंद वाघम ारे इत्यादी दुकानदाराची उपस्थिती होती.



## संपादकीय

# मुलांनो मैदानात या

आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे. कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या, भोवरे, विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटी च्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे. या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# विद्वेषक वक्तव्य करणाऱ्यां निर्लज्ज नेत्यांचे काय करावे समजत नाही!हे मायबाप सरकार यांचे काहीतरी कराच!

पहलगाम आतंकवादी हल्लानंतर भारताने आतंकवाद विरोधी व आतंकवाद्यांना खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानला भारतीय सेनेने चांगलाच धडा शिकवुन चपराक दिली व पाकिस्तानला पाणी-पाणी करून सोडले आणि जगातील अनेक देशांनी ऑपरेशन सिन्दुरची प्रशंसा सुध्दा केली व भारतासोबत आम्ही उभे आहोत अशी ग्वाही सुध्दा दिली.यामुळे अमेरिका,चीन, तुर्की सुध्दा हादरला.परंतु देशातील काही बेवकुफ, निर्लज्ज व बेजबाबदार राजकीय पुढारी असे बोलतात की जणुकाय तेच सिमेवर लढाईला गेले की काय असे वाटते!ते काय खातात कल्पना नाही.कारण ते समाजाबद्दल वाट्टेल बोलुन विष ओकत असतात,भेदभाव निर्माण करतात, देशाच्या सुरक्षेव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करतात, ज्यांच्यापुढे देशाची १४० कोटी जनता नतमस्तक आहे आणि होते अशा कर्नल सोफिया कुरैशी, विंग कमांडर व्योमिका सिंह आणि संपूर्ण सैन्य शक्तीवर जर कोणी प्रश्नचिन्ह उपस्थित करीत असेल तर तो कोणीही असो त्याला देशद्रोहीच म्हणावे लागेल आणि देशद्रोहाची शिक्षा व्हायलाच हवी. घृणास्पद आणि बेजबाबदारपणाचे वक्तव्य करणारे लोक अन्न खातात की आणखी काय खातात कल्पना नाही!सर्वप्रथम कर्नर सोफिया कुरैशी यांच्या बद्दल मध्यप्रदेशचे आदिवासी कल्याण मंत्री विजय शाह यांनी विष ओकले व अप्रत्यक्षरीत्या धर्माच्या नावावर बेताल वक्तव्य करून सेनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले,यानंतर सपा प्रमुख राम गोपाल यादव यांनी वादग्रस्त टिप्पणी करतांना व्योमिका सिंह यांची जात रामगोपाल यांनी नमूद केली आणि म्हणाले विंग कमांडर व्योमिका सिंह ही हरियाणाची जाटव आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये कारवाई करणारे एअर मार्शल अवधेश कुमार भारती यादव हे आहेत.एक मुस्लिम, दुसरा जाटव आणि तिसरा यादव हे युध्द फक्त पीडीए (मागासवर्गीय,दलित, अल्पसंख्याक) यांनीच लढले.अशाप्रकारे घृणास्पद वक्तव्य करून रामगोपाल यादव यांनी जाती-जातीमध्ये दरार निर्माण करण्याचे काम करून जातीयवादाचे जहर पसरविण्याचे काम केले.जेव्हा-जेव्हा भारतीय सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो तेव्हा-तेव्हा संपूर्ण भारतवर्ष एकत्र येतो प्रश्न रहाला सुरक्षा व्यवस्थेचा सुरक्षा व्यवस्थेमध्ये किंवा सेनेमध्ये जात-पात, धर्म याला कोणत्याही प्रकारचा थारा नसतो.सैनिकांचा व सुरक्षा व्यवस्थेचा एक उद्देश असतो देशाची व देशवासीयांची रक्षा करने.परंतु देशात काही नालायक राजकीय पुढारी आताही दिसून येतात आणि बेजबाबदार वक्तव्य करून निघून जातात व नंतर सावसावर करण्यासाठी माफी मांगतात इतके बेशरम असतात हे लोक. जीभेला हाड नसलेले उच्च पदस्थ मध्यप्रदेशचे उपमुख्यमंत्री जगदीश देवडा यांनी भारतीय सैन्यदलांबाबद वादग्रस्त वक्तव्य करून देशाच्या एकतेला धक्का देण्याचे काम केले.ते म्हणतात देश सैन्यदल आणि सैनिक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चरणांशी नतमस्तक झाले आहेतअसे वक्तव्य जगदीश देवडा यांनी करून त्यांची स्वतःची काय लायकी आहे हे दाखवून दिले. जगदीश देवडा यांना कदाचित देशाबद्दल व देशाच्या प्रधानमंत्र्यांबद्दल काहीच कल्पना नसावी ऑपरेशन सिन्दुरने जी बहाद्दूरी दाखविली आणि पाकिस्तानला जमीनीवर लोळवले त्या संपूर्ण सैन्य शक्तीला प्रधानमंत्री माननीय नरेंद्र मोदी सॅल्युट मारतात व नतमस्तक होतात आणि सैन्यामध्ये नव्याने ऊर्जा निर्माण करण्यासाठी सिमावर्ती भागात दौरा करतात म्हणजे आज संपूर्ण देशाची १४० कोटी जनता व स्वतः प्रधानमंत्री भारतीय सैन्य शक्तीपुढे नतमस्तक आहेत आणि जगदीश देवडा बेजबाबदारपने वक्तव्य करून देशवासीयांमध्ये भ्रम निर्माण करण्याचे काम करतात हा अत्यंत गंभीर विषय आहे.हीबाब सत्य आहे की प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे देशाचे खंबीर नेतृत्व आहे यात दुमत नाही.कारण आज भारत तिसरी महाशक्ती होण्याच्या वाटेवर आहे आणि भारत कीती शक्तीशाली देश आहे ही बाब ऑपरेशन सिन्दुर मध्ये संपूर्ण जगाने उघड्या डोळ्यांनी पाहीली.हे संपूर्ण दृष्य डोळ्यासमोर असुनही बेजबाबदार व बेताल वक्तव्य करणारे विजय शाह, रामगोपाल यादव व जगदीश देवडा यांची वक्तव्य वेगवेगळे जरी असले तरी ते सैन्य विरोधी,देश विरोधी व देशाच्या १४० कोटी जनतेला ठेच पोहचविणारे आहेत.यांच्यावर सर्वच स्तरातून टिका सुध्दा झाल्यात तरीही आपापल्या पदावर विराजमान आहेत यावरून स्पष्ट होते हे लोक किती बेशरम असतात. सरकारने यांच्यावर कठोर कारवाई केली नाही तर हे असेच ओकत रहातील.त्यामुळे अशा राजकीय पुढाऱ्यांना त्यांची योग्य जागा दाखविने सरकारचे व न्यायपालिकेचे कर्तव्य आहे. विद्वेषक वक्तव्य करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांना हात जोडून विनंती करतो की,देश हितासाठी थोडीशी तरी जनाची नाही तर मनाची लाज ठेवा! राजकारणात तुम्ही काहीही करा! परंतु देशाच्या सैन्य शक्तीला व सुरक्षेला कुठे ठेच पोहचणार नाही याची काळजी घ्या.यातच खरे देश हित आहे.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या वंदनीय उपस्थितीत सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाला प्रारंभ

# गोव्याचा समुद्र पहाण्यासाठी येणारे लोक आता सनातनच्या कार्यामुळे भारतीय संस्कृती पहाण्यासाठी येतात - डॉ. सावंत

**फोंडा, गोवा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवलेनगरी)** - पूर्वी गोव्यात लोक समुद्र, तसेच अन्य गोष्टी पहाण्यासाठी येत होते; याउलट गोव्यात सनातन संस्थेचे कार्य चालू झाल्यावर नागरिक भारतीय संस्कृती आणि मंदिरे पहाण्यासाठी गोव्यात येतात. गोवा भोगभूमी नसून ही देवभूमी आहे. सनातन संस्कृती आणि शंखनाद महोत्सव यांमुळे येथील अर्थकारण आणि सांस्कृतिक पर्यटन वाढेल. गेल्या २५ वर्षांपासून सनातन संस्था हिंदु धर्माचा प्रसार करण्याचे मोठे कार्य करत असून सनातनने केलेली आध्यात्मिक ग्रंथनिर्मिती युवक यांना प्रेरणा देणारी आणि पुढील १०० वर्षांपर्यंत दिशादर्शक आहे. सनातन संस्थेचे कार्य समाजासाठी दीपस्तंभाप्रमाणे आहे, असे गौरवोद्गार गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी काढले.

सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून गोव्यात १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत फामर्गुडी, फोंडा येथील गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे ऐतिहासिक आयोजन करण्यात आले आहे. त्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी गोवा शासनाच्या वतीने सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांना शाल-श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन विशेष सन्मान केला, तर देशाच्या संरक्षण कार्यासाठी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या हस्ते मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याकडे साहाय्यता निधी सुपूर्द करण्यात आला.

या महोत्सवासाठी सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले आणि सौ. कुंदा जयंत आठवले यांच्या वंदनीय उपस्थितीसह २३ देशांतील १९ हजारांहून अधिक भाविक उपस्थित आहेत. प्रकृतीस्वाथ्य ठिक नसतांनाही साधक आणि भक्तांच्या प्रेमासाठी महोत्सवासाठी उपस्थित असणारे सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या दर्शनाने उपस्थित साधक, हिंदुत्वनिष्ठ भावविभोर झाले. महोत्सवाच्या प्रारंभी शंखनाद, गणेशवंदना आणि वेदमंत्रपठाण झाल्यावर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

या प्रसंगी गोवा येथील कुंडई येथील दत्त पद्मनाभ पीठाचे पद्मश्री सद्गुरु ब्रह्मेशानंद स्वामीजी, 'सनातन बोर्ड'चे प्रणेते पू. देवकीनंदन ठाकूर, केंद्रीय उर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक, गोव्याचे वीजमंत्री श्री. सुदीन ढवळीकर, गोवा राज्याचे समाजकल्याणमंत्री श्री. सुभाष फळदेसाई, भाजपचे गोवा राज्याचे प्रदेशाध्यक्ष श्री. दामोदर नाईक, कर्नाटक येथील म्हैसूर राजघराण्याचे युवराज तसेच म्हैसूरचे खासदार श्री. यदुवीर कृष्ण दत्त चामराज वाडीयार, 'सुदर्शन न्यूज'चे प्रधान संपादक श्री. सुरेश चव्हाणके, सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. चेतन राजहंस आणि श्री. अभय वर्तक उपस्थित होते.

**सनातन राष्ट्राची मुहूर्तमेढ गोवा येथून होत आहे, हा ऐतिहासिक क्षण ! - श्रीपाद नाईक, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री**

याप्रसंगी केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक म्हणाले, ''सनातन राष्ट्राची मुहूर्तमेढ गोवा येथून होत आहे, हा ऐतिहासिक क्षण आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर संभाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने गोवा भूमी पावन झाली आहे. गोव्यात आक्रमकांनी लाखो हिंदूंच्या हत्या केल्या; मात्र तरीही येथील हिंदूंनी सनातन हिंदु संस्कृती अखंड ठेवण्याचे कार्य केले आहे. अशा पावन भूमीत सनातन राष्ट्रासाठी शंखनाद होणे, हा शुभसंकेत आहे. सनातन राष्ट्र निर्मितीच्या कार्यात गोव्यातील धर्मप्रेमी सनातन संस्थेसोबत आहेत.''

**गोवा ही 'बीच'वर बसण्याची नव्हे, तर परशुरामाची उपासना करण्याची भूमी ! - पू. देवकीनंदन ठाकूर**

गोवा ही 'बीच'वर (समुद्रकिनारी) बसण्याची नाही, तर परशुरामाची उपासना करण्याची भूमी आहे. पाकिस्तानचे सरकार जे स्वतः भीक मागणारे आहे, ते आतंकवादी प्रशिक्षित करून इतरांची हानी करतात, तर दुसरीकडे भारतात मंदिरे, गोशाळा आणि वेदविद्यालय यांचे निर्मिती होत आहे. त्यानंतर आमचे राष्ट्र हिंदु राष्ट्र होते आणि पुढेही रहाणार आहे.

**हिंदूंनो, राम-कृष्ण यांचा आदर्श ठेवून शक्तीची उपासना करा ! - पद्मश्री सद्गुरु ब्रह्मेशानंद स्वामी, गोवा**



आज गोव्याची समाजात जी मलिन प्रतिमा होती, ती दूर होऊन एक सात्त्विक परशुराम भूमी म्हणून गोव्याची ओळख सनातन संस्थेच्या कार्यामुळे निर्माण झाली आहे. श्री हनुमान, श्री राम, श्री कृष्ण यांच्या हातात आयुधे आहेत. ही आयुधे धर्माच्या रक्षणासाठी आहेत. आम्हाला शांती हवी आहे. सनातन धर्म टिकल्यानंतरच जगात विश्वास अन् शांती निर्माण होईल. आज हिंदू जागा न झाल्यास, तर उद्याचा दिवस आपला रहाणार नाही. सर्व समाजाने सनातनच्या राष्ट्र आणि धर्म कार्यात सहभागी होण्याची आवश्यकता आहे. आम्हीही या कार्यात सहभागी आहोत. या कार्याला आमचेही आशीर्वाद आहेत.

**राष्ट्राचे सनातनत्व टिकवून ठेवण्यासाठी 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव'! - चेतन राजहंस**

पहलगाममध्ये आतंकवाद्यांनी पर्यटनासाठी आलेल्या हिंदूंची त्यांचा धर्म विचारून हत्या केली. त्यामुळे भारतासमोर उभी असलेली आव्हाने पाहिली, तर 'सनातन धर्मियांचे अस्तित्व आणि सनातन धर्माचे संरक्षण' अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे सनातन धर्माला पुनर्वैभव प्राप्त करून देण्यासाठी 'शंखनाद महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव धर्मभक्तांना आध्यात्मिक बळ देईल, एक नवचैतन्य आणि ऊर्जा प्रदान करेल.

कर्नाटक येथील म्हैसूर राजघराण्याचे युवराज तसेच म्हैसूरचे खासदार श्री. यदुवीर कृष्ण दत्त चामराज वाडीयार म्हणाले, ''अध्यात्म हाच आपला सर्वांचा मूळ गाभा आहे आणि तीच आपल्या सनातन राष्ट्राची मूळ संकल्पना आहे. सनातन राष्ट्र ही राजकीय सत्ताव्यवस्था नसून आध्यात्मिक सेवाभावाने केलेली व्यवस्था आहे.'' या प्रसंगी गोव्याचे वीजमंत्री श्री. सुदीन ढवळीकर, भाजपचे गोवा राज्याचे प्रदेशाध्यक्ष श्री. दामोदर नाईक यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. महोत्सवाच्या प्रारंभी धर्मसंस्थापनेसाठी १ कोटी 'श्रीराम जय राम जय जय राम' या नामजपास प्रारंभ करण्यात आला.

या वेळी 'सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवलेजी का संक्षिप्त चरित्र' या हिंदी भाषेतील ग्रंथाचे, तसेच 'ई-बुक'चे मान्यवरांचे हस्ते लोकार्पण करण्यात आले., 'सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले नगरी'च्या मुख्य प्रवेशद्वाराचे नामकरण 'भगवान परशुराम सुवर्णद्वार', नगरीतील सात मार्गांना 'सप्तर्षी'ची, तर तीन मुख्य मोठ्या सभामंडपांना 'श्रीनिवास मंडपम', 'श्रीदेवी मंडपम' आणि 'भूदेवी मंडपम' अशी नावे देण्यात आली आहेत.

महोत्सवस्थळी भोजनासाठी एकूण १५ मंडप उभारण्यात आले असून त्यांची नावेही देवतांच्या नावाने देण्यात आली आहेत. भगवान श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासह गोवर्धन पर्वत उचलतांनाचे श्रीकृष्णाचे, तसेच अफजलखान वधाचे कटआऊट उभारण्यात आले आहेत., या वेळी 'आर्ट ऑफ लिव्हिंग' संस्थेच्या वतीने १ हजार वर्षांपूर्वीच्या सोरटी सोमनाथ जोतिर्लिंगाचे दर्शन सर्वांना करण्यात आले.

## ऑफलाईन प्रशिक्षणाच्या तारखेत बदल करण्याची शेख अब्दुल रहीम यांची मागणी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** - राज्यात सध्या वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड श्रेणी ऑफलाईन प्रशिक्षणाची चर्चा सुरू आहे आणि आज राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुण्याच्या अधिकृत वेबसाइटवर वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी प्रशिक्षण सर्व जिल्ह्यामध्ये एकाच टप्प्यात म्हणजेच २ जून ते १२ जून२०२५ पर्यंत सुरू होणार आहे. अशी माहिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या अधिकृत वेबसाइटवर झळकत आहे. मुस्लिम समाजातील दुसरा मोठा सण म्हणजे बकरी ईद (ईद उल अज़हा) येत्या ७ जून रोजी आहे आणि ८ ते ९ जून असे सलग तीन दिवस चालते. मुस्लिम समाजामध्ये हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो म्हणून हे प्रशिक्षण मे महिन्याच्या शेवटचा आठवडा अर्थातच २६ मे ते ४ जून २०२५ पर्यंत सुरू करावे. किंवा बकरी ईद (७ जून) आणि दुसरे दिवस (८ जून) असे दोन दिवस प्रशिक्षणाला सुट्टी ठेवावी जेणेकरून मुस्लिम समाजातील शिक्षक बांधवांना सण साजरा करण्यात कोणतीही अडचणी येणार नाही व प्रशिक्षणही व्यवस्थित पार पडेल. अशी मागणीचे निवेदन मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. यांना सादर करण्यात आले. निवेदनाची एक प्रत मा. प्रधान सचिव साहेब, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई. आणि मा. शालेय शिक्षण आयुक्त साहेब, शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे. यांना ही सादर करण्यात आली आहे. निवेदनावर महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन चे राज्य प्रवक्ता तथा हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांची स्वाक्षरी आहे.

पान १ वरुन

## समाजाला अधर्माचा ...

प्रदर्शन पाहिले. मला वाटते की देशातील सर्व संतांनी त्यांच्या शिष्यांना हे शिकवले पाहिजे.''

**सनातन संस्कृतीच्या रक्षणासाठी शक्तीची उपासना करा ! - सतीश महाना, विधानसभा अध्यक्ष, उत्तरप्रदेश**

सनातन संस्कृतीच्या रक्षणासाठी जागृती करणे आवश्यक आहे. या जागृतीसाठी केवळ वाणी नव्हे, तर साहस आणि शौर्य हेही आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक हिंदूने शक्तीची उपासना केली पाहिजे. सनातन संस्कृतीने नेहमी सर्वांचे हितच चिंतिले आहे. तथापि काही पंथांमध्ये 'अन्य धर्मियांना मारा' अशी शिकवण दिली जाते. याविषयी हिंदूंमध्ये जागृती होणे आवश्यक आहे.

**लोकसंख्या नियंत्रण कायदा हाच अनेक समस्यांवर उत्तर ! - अधिवक्ता अश्विनी उपाध्याय** - देशात अल्पसंख्याकांची संख्या प्रचंड वाढत असून हिंदूंची संख्या अल्प होत आहे. अल्पसंख्याकांची संख्या कोट्यवधीमध्ये वाढत असतांना त्यांना अल्पसंख्याक कसे म्हणायचे ? अल्पसंख्यांकांमुळेच लव्ह जिहाद, लँड जिहाद, धर्मांतर यांसह अनेक समस्यांना हिंदू बळी पडत आहेत. प्रतिदिन १० हजार लोकांचे धर्मांतर होत आहेत. हवालाद्वारे पैशाचे फंडीग होत असल्याने धर्मांतर होत आहे. घुसखोर सिंगापूर, चीन, अरब राष्ट्रात घुसखोरी न करता ते भारतातच का येतात ? कारण काँग्रेसने केलेल्या अनेक कायद्यांद्वारे त्यांना केवळ सुविधाच मिळतात असे नाही, तर कायदेशीर संरक्षणही मिळते. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रण कायदा हाच अनेक समस्यांवर उत्तर आहे.

**'सनातन राष्ट्रा'साठी 'धर्मदूत' बनण्याचा संकल्प करूया ! - सद्गुरु चारुदत्त पिंगळे** - भारताला 'सनातन राष्ट्र' बनवणे, हा संतांचा संकल्प आहे. हा संकल्प पूर्ण करण्यासाठी आपल्याला सर्वोत्कृष्ट योगदान द्यावे लागेल. विभीषण रामनाम घेत होता, तो श्रीरामाचा भक्त होता; पण हनुमंताने सांगितले, ''केवळ रामनाम घेतल्याने प्रभूंची कृपा होणार नाही, तर प्रभूंचे कार्य केले, तरच प्रभूंची कृपा होईल !'' आपल्यालाही आज रामकाजाचा, म्हणजे राष्ट्र आणि धर्म यांच्या रक्षणाचे कार्य करण्याचा संकल्प करावा लागेल. 'सनातन राष्ट्रा'साठी 'धर्मदूत' बनण्याचा संकल्प करावा लागेल !

**धर्मासाठी हिंदूंना कट्टर व्हावेच लागेल ! - महंत श्री राजूदासजी महाराज, अयोध्या** - सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवामध्ये हिंदुत्वाचा जागर होत आहे. हिंदुत्व वाचले, तर राष्ट्र वाचेल आणि भारत टिकला, तर विश्व वाचेल. अन्य पंथ हे मौजमजेसाठी आहेत. केवळ सनातन धर्मामध्ये विश्वकल्याणाची भावना आहे. यासाठीच सनातन धर्माचे रक्षण आवश्यक आहे. सर्व संतांनी धर्मरक्षणासाठी भक्तांना जागृत करायला हवे. धर्मासाठी हिंदूंना कट्टर व्हायलाच लागेल.

**धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्या संयोगानेच सनातन राष्ट्राची स्थापना ! - स्वामी बालकानंद गिरीजी महाराज** - शंकराचार्यांचे सैन्य असलेल्या आखाड्यांवर आजपर्यंत कोणीही कब्जा करू शकलेले नाही. आज आपल्या हृदयात जागृती आली पाहिजे की, धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्या संयोगानेच सनातन राष्ट्राची स्थापना होऊ शकते.

**सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवातून विश्वरूपाचे दर्शन मला झाले आहे ! - श्री. सुरेश चव्हाणके** - वर्ष २००८ मध्ये भगवा आतंकवाद, साध्वी प्रज्ञासिंह यांना अटक आणि त्यांच्यावर झालेले अत्याचार अशा प्रकारे हिंदु धर्माची अपकीर्ती चालू असतांना मी सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांची भेट घेऊन यावर चर्चा केली होती. त्या वेळी त्यांनी दिव्यदृष्टीने जी माहिती दिली, त्याची प्रचिती आजही मला येत आहे. इतर अध्यात्मिक संघटना विज्ञानाच्या आधारे हिंदूंना मार्गदर्शन करतात; मात्र सनातन संस्था ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज यांचे ज्ञान देऊन धर्मकार्य करत आहे. खर्या अर्थाने धर्म आणि अध्यात्म यांचा प्रचार करत आहे. यासाठी शंखनाद महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवातून विश्वरूपाचे दर्शन मला होत आहे.

**सनातन संस्थेच्या विचार प्रत्येक हिंदूच्या मनात येईल, तेव्हा भारत हिंदु राष्ट्र होईल ! - स्वामी आनंद स्वरूप-** साधू-संतांच्या आखाड्यांची शौर्यगाथा आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची शौर्यगाथा प्रत्येकाला सांगितली पाहिजे. मी सनातनच्या साधकांच्या चेहर्यावर तेज पहातो आणि प्रत्येक सनातनच्या साधकामध्ये प.पू. डॉ. आठवले यांना पहातो. सनातन संस्थेच्या विचार प्रत्येक हिंदूच्या मनात येईल, तेव्हा भारत हिंदु राष्ट्र होईल.

**पुढच्या पिढीला रामायण आणि गीतेच्या शिकवणीपासून वंचित ठेवू नका ! - पू. धर्मयशजी महाराज-** हिंदु धर्म हा हिरा आहे. त्यामुळे त्याचे सतर्कतेने रक्षण करून धर्म पुढे वाढवायचा आहे. आपली मुले सनातन धर्म पुढे घेऊन जाणार आहेत. त्यामुळे मुलांना गीता आणि रामायण तर शिकवावेच लागेल.

# दहशतवाद्यांचा बिमोड करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर सुरू ठेवा- आनंदराज आंबेडकर

**जालना । प्रतिनिधी -** भारताने देशांतर्गत दहशतवादी कारवाया थांबवण्यासाठी तसेच दहशतवाद्यांचा बिमोड करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर सुरू ठेवावे, अशी मागणी रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी आज येथे पत्रकार परिषदेत केली. दरम्यान, रिपब्लिकन ऐक्याचा विषय आता संपुष्टात आला असल्याचे ते म्हणाले.

जालना येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित या पत्रकार परिषदेस रिपब्लिकन सेनेचे नेते तथा जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रभारी डॉ. सुशील सूर्यवंशी, नांदेड जिल्हा प्रभारी प्राचार्य सुनील वाकेकर, जालना जिल्हाध्यक्ष दिनेश आदमाने, भीमराज खरात आदींची उपस्थिती होती.

पत्रकार परिषदेत बोलतांना आंबेडकर पुढे म्हणाले की, पहलगाव येथील पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याला भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानातील दहशतवादी तळे उध्वस्त केली, या पराक्रमाबद्दल भारतीय सैन्य दलाचे आम्ही अभिनंदन करतो. भारताने पाकिस्तानमधील दहशतवादी केंद्र उध्वस्त केल्यानंतर पाकिस्तान मेटाकुटीला आला होता, भारतीय सैन्य दलाच्या कारवाईमुळे उभय देशात एक प्रकारचे युद्ध सुरू झाले होते, त्यातच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धविरामासाठी हस्तक्षेप केला, डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेला हा हस्तक्षेप योग्य नाही, हा हस्तक्षेप भारताच्या संरक्षण विषयक बाबीसाठी घातक आहे.

भारताने देशांतर्गत दहशतवादी कारवाया थांबवण्यासाठी तसेच दहशतवाद्यांचा बिमोड करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर सुरू ठेवले पाहिजे,यामुळे सीमावर्ती भागातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल. भारताने पाकिस्तान व्याप्त काश्मीर आपल्या ताब्यात घेऊन हा वाद- प्रश्न कायमचा संपुष्टात आणावा. भारताने बलुचिस्तान व सिंध प्रांतातील नागरिकांना मदत करावी, जेणेकरून पाकिस्तानमधील दहशतवादी कारवायांचा उद्रेक थांबेल, असेही ते म्हणाले.

महाबोधी बुद्धविहाराच्या मुक्तीसाठी रिपब्लिकन सेनेने




महाराष्ट्र राज्यात सर्वप्रथम आंदोलनाची भूमिका घेतली, मुंबई येथे महामोर्चा काढला. केंद्र सरकारने महाबोधी बुद्धविहार अबौद्धांच्या ताब्यातून बौद्ध व्यवस्थापनाकडे सोपवावे, अशी मागणीही आंबेडकर यांनी केली.

महाराष्ट्र राज्यात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत, रिपब्लिकन सेना ह्या निवडणुका पूर्ण ताकदीने लढविणार आहे. या निवडणुकीत समविचारी व सन्मानाची वागणूक देणाऱ्या पक्ष/ संघटनांसोबत युती करण्याची रिपब्लिकन सेनेची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्य सरकारने जनतेच्या पाणी, निवारा, शेतजमीन, रोजगार आदी प्रश्नांकडे लक्ष केंद्रित करावे, अशी मागणी करत रिपब्लिकन ऐक्याचा विषय आता संपुष्टात आला असून नवीन पिढी या ऐक्याबाबत चर्चा करीत नसल्याचे ते म्हणाले.

## सायबर सुरक्षित महाराष्ट्र उपक्रमास ; मुख्यमंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद



**मुंबई -** देशभरात सायबर सिक्युरिटी या महत्वपूर्ण विषयात देशाच्या लोकसंख्येनुसार ५ लक्ष सायबर एक्सपर्टची आवश्यकता असून,आपल्या देशात ७५ हजारांहून अधिक संख्येत सायबर एक्सपर्ट उपलब्ध आहेत,देशाची गरज आपले राज्य भरून काढू शकेल हा विचार करून राम अँटीव्हायरस प्रायव्हेट लिमिटेड यांनी कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, केशव स्मृती जळगाव, महा'जनशक्ती' परिषद अश्या विविध मोठमोठ्या संस्थांच्या सहकार्याने सायबर सुरक्षित महाराष्ट्रासाठी १0000 सायबर सुरक्षा तज्ञ तयार करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा उद्देश डिजिटल युगाच्या आव्हानांना सामर्थ्यपणे सामोरे जाण्यासाठी सायबर सुरक्षा क्षेत्रातील एक्सपर्ट निर्माण करणे आणि सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करणे हा महत्वपूर्ण उपक्रम आहे. यात विद्यापीठ मान्यताप्राप्त अभ्यासक्रम,प्रमाणपत्रे आणि पदव्युत्तर डिप्लोमा प्रदान करणे., सायबर सुरक्षा,बँकिंग सुरक्षा,कृत्रिम बुद्धिमत्ता,डिजिटल मार्केटिंग यांसारख्या विषयांमध्ये प्रशिक्षण देणे., सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे आदींचा समावेश असणार आहे.

# बाल संस्कार शिबिर उत्साहात



**मंठा । प्रतिनिधी -** श्री क्षेत्र शंभू महादेव संन्यास आश्रमा मध्ये परमपूज्य तपोनिधी सद्गुरु श्री महंत रामगिरीजी महाराज व सद्गुरु श्री महंत सेवागिरीजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने तसेच श्री क्षेत्र शंभू महादेव देवस्थानचे अध्यक्ष गुरुवर्य परमश्रद्धेय श्री महंत भागवतगिरीजी महाराज व शंभू महादेव देवस्थानचे सचिव श्री महंत बालकगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व भाविक भक्तांच्या सहकार्याने दि.३० एप्रिल ते १५ मे असे १६ दिवसीय बाल संस्कार शिबिर संपन्न झाले. या शिबिराचा समारोप दिनांक १५ मे गुरुवार रोजी श्री क्षेत्र शंभू महादेव देवस्थान येथे झाला. या बाल संस्कार शिबिरा मध्ये आदरणीय श्री महंत बालकगिरीजी महाराज यांनी विद्यार्थ्यांना प्राणायाम योगासने ईत्यादींचे प्रशिक्षण दिले. त्याच प्रमाणे श्री मद्भगवदगीता, हनुमान चालीसा, हरिपाठ, दैनंदिनी म्हणावयाचे श्लोक इत्यादी पाठ करून घेण्यात आले त्याचप्रमाणे गायन वादन हरमुनीयम मृदंग इत्यादी वाद्यांचे प्रशिक्षण देण्यात आले सर्वात या शिबिरामध्ये मुख्य आकर्षण म्हणजे शिवकालीन क्रीडा या मध्ये लाठी काठी, दांडपट्टा, कराटे, दंड साखळी, मुद्गल व घोडेस्वारी इत्यादींचे प्रशिक्षण देण्यात आले शिवकालीन क्रीडा म्हणजे आजच्या युगामध्ये लुप्त पावत चाललूली क्रीडा आहे हे आत्मसात केल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक मानसिक बौद्धिक विकास होऊन विद्यार्थ्यांचे मनोबल वाढते अशाप्रकारे या बाल सु-संस्कार शिबिरामध्ये विद्यार्थ्यांचा शारेरिक, मानसिक व बौद्धिक विकासावर लक्ष देण्यात आले. १५ मे रोजी प्रशिक्षण दिलेल्या कलेचे प्रात्यक्षिक ठेवण्यात आले होते सर्वप्रथम गुरुवर्य परमश्रध्येय श्री महंत भागवतगिरीजी महाराज व श्री महंत बालकगिरीजी महाराज आणि मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले त्यानंतर गुरुवर्य श्री महंत भागवतगिरीजी महाराज यांचे पूजन प्रल्हादराव पिठोरे काकडा यांच्या हस्ते झाले श्री महंत बालकगिरीजी महाराज यांचे पूजन सुभाषराव सहाने शंभू सावरगाव यांच्या हस्ते झाले. त्यानंतर आश्रमाचे पुजारी विजय महाराज माचे यांचे स्वागत विठ्ठल नाना चव्हाण गोसावी पांगरी यांनी केले व आध्यात्मिक प्रशिक्षण देणारे हरिभक्त परायण अध्यापक व शिक्षक यांचा सत्कार स्वतः श्री महंत बालकगिरीजी महाराजांनी केला व सर्वांना शुभ आशीर्वाद दिला. त्यानंतर शिवकालीन क्रीडा घोडेस्वारी व अध्यात्मिक जे पाठांतरण केले त्याचे प्रात्यक्षिक पालक तसेच भावी भक्तांना दाखवण्यात आले अध्यक्षीय भाषण श्री महंत बालकगिरी बाबाजी यांनी केले त्यानंतर पसायदान घेऊन या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली त्यानंतर उपस्थित पालक विद्यार्थी व भाविक भक्तांना महाप्रसादाचे आयोजन अंभोरा जहागीर येथील असणाऱ्या सौभाग्यवती पार्वती सुधाकरराव दौंडकर यांच्यातर्फे करण्यात आले होते.बाबाजींनी त्यांचा सत्कार करून त्यांनाही शुभाशीर्वाद दिला व असेच आपणाकडून उत्तरोत्तर अन्नदानाची सेवा घडत राहो म्हणून शुभ आशीर्वाद दिला. अशाप्रकारे आनंदात उत्साहात १६ दिवसीय बालसंस्कार शिबिर पार पडले.

# मनपाने अवैधरित्या कुत्रे पकडल्याबाबत प्राणी क्लेश निवारण समितीची संबंधितावर गुन्हे दाखल करण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** महानगरपालिकेने जवळपास शंभरच्यावर कुत्रे जालना शहरातुन अवैध पध्दतीने उचलून सिंदखेड राजा रोडवर सोडले या प्रकारणी जवाबदार असणाऱ्यावर गुन्हे दाखल करन्याची मागणी प्राणी क्लेश निवारण समितकडुन करण्यात आलीय. या विषयीची तक्रार कदीम पोलिसांत देण्यात आलीय.

मोकाट कुत्र्यांनी केलेल्या हल्यात एका लहान मुलीचा मृत्यू झाला. त्यामुळे जालना महानगर पालिकेने कुत्रे पकडण्याची मोहिम राबविली. शिकलकरी, तसेच खाजगी लोकांना ही जबाबदारी महानगर पालिकेने दिली होती. ही मोहिम ८ ते ११ मे २०२५ या काळात सुरू होती. त्यांनी ९ व १० मे रोजी भटकी कुत्री पकडली, हे कुत्रे पकडण्या संदर्भात महानगरपालिकेकडे तक्रार अर्ज आल्यांनतर त्यांनी ही मोहिम सुरू केली. खाजगी लोकांना कुत्रे पकडून बाहेर सोडण्यासाठी महानगरपालिकेने सांगीतले. ही मोहिम चालू असतांना महानगरपालिकेने कुठल्याच प्रकारची काळजी घेतली नाहये. तसेच त्यांना कुत्रे पकडून सोडण्याचा अधिकार नसताना त्यांनी अनिमल बर्थ कन्ट्रोल (प्राणी जन्म नियंत्रण दर) चे उल्लंघन केलय. अमानुष पध्दतीने या खाजगी लोकांनी फासाच्या सहाय्याने भटकी कुत्रे पकडली. त्यातील ३ ते ४ कुत्रे मरण पावलेत. ज्या फिमेल डॉगीने म्हणजे कुत्रीने नवजात पिलांना जन्म दिला होता. अशा कुत्रींना देखील उचलून नेले. त्यामुळे नवजात कुत्रींची पिल्ले आईविना मरत आहेत. महानगरपालिकेने कोणत्याच नियमाचे पालन केले नसून क्रूर पध्दतीने भटया कुत्र्यांना उचलून सिंदखेड राजा रोडवर जंगलात सोडले. राहत्या ठिकाणाहुन हे कुत्रे सोडले त्यामुळे कुत्र्यांवर उपासमारीची वेळ येत असून तसेच कुत्री हायवेवर पळतांना गाडीखाली पण जातायेत.

२२ नोव्हेंबर २०१७ रोजी देखील सी.ओ. म्हणून सध्याचे आयुक्त संतोष खांडेकर हे होते, त्यांनी जालना शहरात कुत्रे पकडण्याची मोहिम सुरू केली होती. नगर पालिकेने अवैध पध्दतीने नियमाचे उल्लंधन करून भटकी कुत्री पकडून सोमनाथ जळगावच्या जंगलात सोडून दिली. त्यावेळेस देखील त्यांनी हे काम खाजगी खिकलकरी लोकांना दिले. या संदर्भात तत्कालीन जिल्हाधिकारी शिवाजी जोंधळे यांच्याकडे २२.११.२०१७ रोजी तक्रार केली होती. आ. मेनका गांधी यांनी फोन करून जिल्हाधिकारी शिवाजी जोंधळे व सी.ओ यांना त्वरीत मोहिम बंद करण्यास सांगीतले. याच पध्दतीने घटना पुन्हा घडली.

आयुक्त संतोष खांडेकर उप आयुक्त प्रियंका राजपूत मॅडम व स्वच्छता निरीक्षक पंडीत पवार, महानगरपालिका कर्मचारी तसेच खाजगी लोक यास जबाबदार असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे.त्यांनी अमानवीय पध्दतीने कुत्र्यांना वागणुक दिली, त्यातील ४ ते ५ कुत्री पकडतांना मेली. कुत्र्याला पकडतांना फासाने पकडून सिंदखेड राजा रोडवर जंगलात सोडली. त्यामुळे त्यांनी प्राणी कल्याण कायदा १९६० चे उल्लंघन करून गुन्हा केलाय. त्यामुळे आयुक्तांसह सर्वावर सेक्शन ४२८ आणि ४२९ भारतीय न्याय संहिता (इंडीयन पिनल कोर्ट) तसेच सेक्शन ११ (१) आणि ११ (१) (जे) पी.सी.ओ. ॲक्टनुसार कायदेशिर कारवाई करावी करण्याची तक्रारदारांनी मागणी केलीय.

१० मे रोजी गांधीनगर भागात काही लोकांनी जवळपास १० ते १२ कुत्र्यांना दगडाखाली व लाकडाखाली मारून जायबंद केले व ठार मारले, व इतरत्र फेकून दिले.. या संदर्भात चौकशी करून त्यांचेवर गुन्हे दाखल करावे अशी मागणी प्राणी कलश निवारण समितीने केली.

# खुशी मानधने सीबीएसई पॅटर्न दहावी परीक्षेत परभणी जिल्ह्यात प्रथम

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा येथील सुप्रसिद्ध डॉ. नितीन मानधने यांची मुलगी कु. खुशी नितीन मानधने हिने सीबीएसई पॅटर्न दहावी परीक्षेत ९९% गुण मिळवून परभणी जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. खुशी मानधने ही सेलू येथील श्रीराम प्रतिष्ठानच्या प्रिंस इंग्लिश शाळेमध्ये शिकत होती. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांनी आपल्या संस्थेतील कर्मचाऱ्यासह मंठा येथे घरी येऊन तिचा सत्कार केला. या यशामागे आपल्या शाळेतील शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन व आई -वडिलांची प्रेरणा असून पुढील शिक्षणासाठी पुणे येथे जाणार असल्याचे कु. खुशीने सांगितले. तिला वैद्यकीय क्षेत्रातच आपले करिअर घडवायचे असल्याचे तिने यावेळी सांगितले. कु. खुशीला मिळालेल्या या यशाबद्दल शहरातील अनेक प्रतिष्ठित व्यापारी व डॉक्टरांनी अभिनंदन केले.



# जालना लायन्स क्लबला ११ पुरस्कार



**जालना । प्रतिनिधी -** नाशिक येथे शनिवार दि. १७ मे रोजी पार पडलेल्या लायन्स इंटरनॅशनल मल्टीपल ३२३४ च्या बहुप्रांतीय अधिवेशनात लायन्स क्लब ऑफ जालनाचा एकूण ११ पुरस्कार प्रदान करून सन्मान करण्यात आला, ही बाब जालन्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे

लायन्स इंटरनॅशनलचे तृतीय अध्यक्ष मनोज शहा, जितेन्द्रसिंह चव्हाण, नवल मालु, मल्टीपल चेअरपर्सन सुनिल देसरडा आणि गॅट समन्वयक प्रदीप गर्ग यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. क्लबला मिळालेल्या ११ पुरस्कारांमध्ये २ वैयक्तिक आणि ९ क्लब स्तरावरील पुरस्कारांचा समावेश आहे. वैयक्तिक पुरस्कारांमध्ये मीनाक्षी दाड यांना डिस्ट्रिक्ट कॅबिनेट ग्लोबल सर्व्हिस टीम कोऑर्डिनेटर म्हणून उत्कृष्ट कार्याबद्दल तर अतुल लड्ढा यांना डिस्ट्रिक्ट कॅबिनेट मार्केटिंग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी गौरवण्यात आले तर क्लबला ग्लोबल लीडरशिप अचिव्हमेंट, ग्लोबल एक्स्टेंशन अचिव्हमेंट, मधुमेह इन्व्हायर्नमेंट, हंगर, चाईल्डहुड कॅन्सर, न्यू व्हॉइसेस इनिशिएटिव्ह, महिला सक्षमीकरण, फॅमिली अँड वूमन मेंबरशिप या ९ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी माजी प्रांतपाल तथा बहुप्रांतीय सचिव पुरुषोत्तम जयपुरीया, क्लब अध्यक्षा जयश्री लड्ढा, सचिव मंजु श्रीमाली, कोषाध्यक्ष कल्पना बियाणी, झोन चेअरपर्सन राजेश लुणीया, मीनाक्षी दाड, अतुल लड्ढा, जयप्रकाश श्रीमाली, बद्रीनारायण बियाणी, राजेश देवीदान, अरुण मित्तल, श्याम लोया, कमलकिशोर बगडिया, सरीता बगडिया, विजय दाड, दीनेश लोहिया, सपना लुणीया, बळीराम बेंद्रे, सुनिल बियाणी, विनोद पवार, राज केदारे, शतीश संचेती , नरेंद्र मोदी, प्रेमलता मोदी, अशोक मिश्रा, धर्मेंद्र कुमावत आदींची उपस्थिती होती.



# दहावी, बारावी, गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा



**परतूर । प्रतिनिधी -** दृष्टी फाउंडेशन व लॉयन्स क्लब परतुर वतीने दृष्टी लॉयन्स नेत्रालय येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा दि.१६ में रोजी पार पडला .

दृष्टी लॉयन्स नेत्रालय येथे दहावी मध्ये नाविन्यपूर्ण गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. परतुर येथील उपविभागीय पोलीस अधिकारी, दादा हरी चौरे यांच्या हस्ते सर्व मुलांना सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला आहे .भारत पाकिस्तान युद्धा मध्ये कार्य केलेले . वायुसेनेमध्ये कार्यरत असलेले विंगकमांडर सुशीलकुमार शिंदे यांच्या पालकाचा सुनीलराव शिंदे यांचा सन्मानही करण्यात आला . एकूण ७५ गुणवंत विद्यार्थ्यांचा या कार्यक्रमांमध्ये सत्कार करण्यात आला . दृष्टी फाउंडेशन व लायन्स क्लब परतूरच्या माध्यमातून नेत्रालयामध्ये या सोहळ्याला भरपूर असा पालकांनी विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला . चौरे यांनी मार्गदर्शन करत असताना मुलांना शुभेच्छा देत अनेक प्रोत्साहनदायक उदाहरणे दिली . प्रस्ताविक मध्ये खालापुरे यांनी लायन्स क्लब दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करत आहे . इतर मुलांना हे प्रोत्साहन मिळावं आपल्या परिसरातील मुल उच्च पदावर जाऊन यशस्वी व्हावे व समाजाची व देशाची सेवा करावी हाच उद्देश या समारंभाचा आहे असे बोलले . या कार्यक्रमाला अनेक पालक उपस्थित होते . ला विशंभर दहिवाल लॉ प्रशांत पुरी लॉ मुकुंद शेपाळ लॉ संजीवनी खालापुरे लॉ मंजुषा पुरी लॉ गुड्डू बहिवाल लॉ बबनराव उनमुखे लॉ संतोष शिंदे प्रा रवींद्र जोशी व इतर उपस्थित होते.

लायन्सच्या किसान सन्मान शिबिरात शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचा मूलमंत्र

# बीजोत्पादन, शेडनेट शेती, भाजीपाला लागवड, मोसंबी प्रमाणीकरण व निर्यातीवर मार्गदर्शन



**जालना । प्रतिनिधी -** शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतींना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत शेतीत भरघोस उत्पादन घ्यावे, नवे प्रयोग करून शेती फायदेशीर करावी, यासाठी लायन्स क्लब ऑफ जालनातर्फे आयोजित किसान सन्मान व कृषि मार्गदर्शन शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. बीजोत्पादन, शेडनेट शेती, भाजीपाला लागवड तसेच 'जालना मोसंबी'च्या प्रमाणीकरण व निर्यातीसारख्या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

सामनगाव येथील सफल सीड्स फार्मवर हे शिबिर शुक्रवार दि. १६ मे रोजी पार पडले. याप्रसंगी सामनगावचे सरपंच प्रल्हाद नेमाने, उपसरपंच शंकर चिरखे, ग्रामपंचायत सदस्य कैलास भालेराव, बंडू नाबदे, विष्णू नाबदे, पुंजाराम नेमाने, रामेश्वर शिंदे, गणेश कावळे, शिवनाथ नेमाने, लायन्स क्लबच्या अध्यक्ष जयश्री लड्ढा, सचिव मंजू श्रीमाली, प्रकल्प प्रमुख तथा सफल सीड्सचे चेअरमन कमलकिशोर झुनझुनवाला, द्वारकादास मुदंडा, लायन बळीराम बेन्द्रे, सदस्य लायन जयप्रकाश श्रीमाली व लायन अतुल लड्ढा यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी कमलकिशोर झुनझुनवाला यांनी आधुनिक बीज उत्पादन, शेडनेट शेती, जागतिक बाजारपेठ आणि निर्यात क्षमतेबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. केवळ चार महिन्यांत लाखोंचे उत्पन्न देणाऱ्या या पद्धतीसह भारतातून संपूर्ण जगभर बीज निर्यातीच्या संधींवर त्यांनी सखोल माहिती दिली. फार्म मॅनेजर, प्रोडक्शन मॅनेजर आणि संशोधन विभागातील तज्ज्ञांनीही सहभागी शेतकऱ्यांना वैज्ञानिक पद्धतीने माहिती दिली.

अतुल लड्ढा यांनी जालना मोसंबी या विषयावर माहिती देताना सांगितले की, भौगोलिक मानांकन मिळून आठ वर्षे पूर्ण होऊनही फक्त १२०० बागायतदारांची नोंदणी झालेली आहे. सध्या जिल्ह्यातील २० हजारावर शेतकऱ्यांची ५० हजार एकरवर मोसंबी लागवड असून, उत्पादनाचे अचूक मूल्यांकन, प्रमाणपत्रीकरण व निर्यात प्रक्रियेसाठी नोंदणी अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

क्लबच्या अध्यक्ष जयश्री लड्ढा म्हणाल्या की, आधुनिक शेतीतील नवतंत्रज्ञानाचा प्रसार, बीज उत्पादन प्रक्रियेचे महत्त्व आणि नोंदणीविषयक जागरूकता वाढवणे हे या शिबिराचे उद्दिष्ट होते.

कार्यक्रमानंतर प्रत्येक शेतकऱ्याला सफल सीड्स कंपनीकडून भाजीपाला बीजाचे पाकीट देण्यात आले. परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने या शिबिरात सहभाग नोंदविला.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.